जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

पुणे पोलीस
Pune Police

# दैनंदिन गुन्हयाची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०४/०५/२०२१
## दि.०३/०५/२०२१ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

**पो.स्टे.गुरनं./कलम** चंदननगर पो स्टे ११२/२०२१,भादविक १०९,१४३,१४७,१४९,३३६,३३७,४२७,५०४,५०६,५०९

**फिर्यादी** आरीफ बेग,वय-४७,रा.स.नं.२२/२,खराडी,पुणे

**आरोपी** डेव्हलपर्सचे संचालक व त्यांचे २०० ते ३०० अनोळखी बांधकाम कामगार महिला व पुरूष (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०३/०५/२०२१ रोजी ०८/०० वा.खराडी सनं.२२/२,येथील फिर्यादी यांचे राहते घरासमोर मोकळया जागेत

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे घरासमोर खासगी डेव्हलपर्सचे संचालक याचे सांगणेवरुन यातील नमुद २०० ते ३०० महिला व पुरूष यांना कामगारांचे वेशात येवुन,सदर ठिकाणी बेकायदेशीररित्या जमा होवुन मा.न्यायालयाने दिवाणी दाव्यामध्ये दिलेल्या आदेशाचा भंग करुन,फिर्यादी व त्यांचे नातेवाईकांचे ताबेवहिवाटीच्या जागेत व रस्त्यावर बॅरीकेटस उभी करुन काम करणेस सुरूवात केली. फिर्यादी व त्यांचे कुटुंबियांनी प्रतिकार केला असता,सदर आरोपी यांनी फिर्यादीस व कुटुंबियांना शिवीगाळ करुन,धक्का-बुक्की करुन,जीवे मारण्याची धमकी देवुन,दगडे अंगावर फेकुन मारुन जखमी करुन तसेच फिर्यादी यांचे घरासमोर लावलेल्या गाडयांचे पत्रे तसेच काचा फोडुन नुकसान केले आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. भालचंद्र ढवळे ९९६७५२७६६०

२

**पो.स्टे.गुरनं./कलम** चंदननगर पो स्टे ११३/२०२१,भादविक ३२६,३२४,३२३,१४३,१४७,१४८,१४९

**फिर्यादी** कैलास खैरे,वय-३१,रा.७५/८,शांतीनगर,वानवडी,पुणे

**आरोपी** दोन इसम व त्यांचे इतर २० ते २५ नातेवाईक (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०३/०५/२०२१ रोजी ०८/३० वा.गोयलगंगा ग्रुपचे बांधकाम साईटवर बेगनगर खराडी बायपास रोडजवळ खराडी,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे सदर ठिकाणी बिगारी काम करण्यासाठी आले असता,सदर ठिकाणी कंपाऊंड वॉलचे काम चालु असताना,यातील नमुद दोन इसमांनी हॉकी स्टीक घेवुन येवुन,फिर्यादी यांना अचानक मारहाण करण्यास सुरूवात करुन,त्यांचे मदतीला आलेल्या इतर आरोपी यांनी बेकायदेशीर जमाव जमा करुन,फिर्यादी यांचे डावे पायास जबर दुखापत करुन,फ्रॅक्चर करुन बोटास,पाठीवर व कमरेवर दगडाने मारहाण केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. विवेक सिसाळ ९४०४२५७९६४

३

**पो.स्टे.गुरनं./कलम** हडपसर पो स्टे ३२९/२०२१,भादविक १८८,१४१,१४३,१४७,१४९,३२४,५०४,राष्ट्रीय आपत्ती व्यव.का.क.५१(ब),कोविड -१९ चे क.११ प्रमाणे

**फिर्यादी** बाळु राखपसरे,वय-२७ वर्ष,रा.चंदवाड,ता.हवेली,जि.पुणे

**आरोपी** सहा इसम (अटक नाही)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.०२/०५/२०२१ रोजी १६/०० वा.चंदवाडी फुरसुंगी,ता.हवेली,जि.पुणे येथे शंकर नाना हरपळे यांचे रिकाम्या जागेमध्ये

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी व त्यांचे भाऊ १.स्वप्नील राखपसरे २.राजु राखपसरे ३.प्रमोद राखपसरे असे ते राहत असलेल्या घराच्या पाठीमागील शंकर नाना हरपळे यांच्या रिकाम्या जागेत क्रिकेट खेळत असताना,फिर्यादी यांच्या वस्तीच्या बाजुला राहणारे यातील नमुद आरोपी यांनी सदर ठिकाणी येवुन फिर्यादी सोबत क्रिकेट खेळण्याची इच्छा व्यक्त केली. त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना विरोध केल्याचा राग मनात धरुन,बेकायदेशिर जमाव जमवुन,सध्याच्या कोविड प्रादुर्भावाच्या काळात शासकीय जमाव आदेशाचा भंग करुन,क्रिकेटच्या बॅटने व लोखंडी सळईने फिर्यादी व त्यांच्या भावांना मारहाण करुन दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. विश्वास भाबड ९८५०२९९७७६ |
| **४** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ३३०/२०२१,भादविक १८८,१४१,१४३,१४७,१४९,३२४,४२७,४५२,५०४,५०६,राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन का.क.५१(ब),कोविड १९ चे क ११ |
| **फिर्यादी** | सुरेश चंद,वय-५४ वर्ष,रा.चंदवाडी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | आठ इसम व महिला (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०५/२०२१ रोजी १६/०० ते १८/४५ वा.चे दरम्यान चंदवाडी,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा मुलगा अक्षय व त्याचे सहकारी यांना यातील नमुद आरोपी यांनी क्रिकेट खेळण्याच्या वादातुन बेकायदेशिर जमाव जमवुन,कोयत्याने मारहाण करुन,फिर्यादी व समीर गायकवाड यांच्या घराच्या काचा फोडुन त्यांचेवर हमला करण्याच्या उद्देशाने अतिक्रमण करुन वस्तुंची नासधुस करून नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. रत्नदिप गायकवाड ८७६६८९५७६६ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे २५२/२०२१,भादविक २७९,३०४(अ),३३८,मोव्हेॲक्ट १३२(१)(क),११९/१७७ |
| **फिर्यादी** | सागर गोते,वय-३६ वर्ष,बिवरी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात डंपरवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०२/०५/२०२१ रोजी १५/०० वा. मौजे बिवरी,ता.हवेली,जि.पुणे येथे रहाते घरासमोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडील वडील जिजाबा सोनबा गोते,वय-७२ वर्ष,रा.मौजे बिवरी,ता.हवेली,जि. पुणे हे मोटार सायकलवरून त्यांचे शेतामध्ये जात असताना,त्यांचे राहते घराचे पुढे १०० फुट अंतरावर त्यांचे पाठीमागुन येणा-या नमुद डंपरवरील चालकाने त्याचे ताब्यातील डंपर हा वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी जिजाबा गोते यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्यांचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. सुहास पाटील ९१३७२४३०५६ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ८६/२०२१,भादविक ४०६,४२०,३४ |
| **फिर्यादी** | निलेश उपासनी,वय-४८ वर्षे,रा.टिंगरेनगर,विश्रांतवाडी,पुणे |
| **आरोपी** | कंपनी वागळे इस्टेट,ठाणे या फायनांन्स ॲन्ड इन्व्हेसमेंन्ट कंपनीचे नॅशनल हेड व इतर एक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०२/२०२१ ते दि.१२/०३/२०२१ रोजी फ्लॅट नं.१,गौरव क्लासीक,सर्वे नं.३४/१,रोड नं.११, टिंगरेनगर,विश्रांतवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची भागीदारी मध्ये खासगी कंपनी असुन,त्यावर कंपनीच्या नावाने केमिकल प्लान्टचे काम चालु केले. सदर प्लॅन्टचे बांधकामासाठी व मशिनरी यांचेसाठी वागळे इस्टेट,ठाणे या फायनांन्स ॲन्ड इन्व्हेसमेंन्ट कंपनीचे नॅशनल हेड याने फिर्यादीस १६ कोटी रुपये कर्ज देण्याचे सांगुन,फिर्यादी यांचा विश्वास संपादन करून,त्यांचेकडून ३२,३८,२००/- रक्कम कर्जाचे मॉर्गेज ॲग्रीमेंन्टसाठी त्याचा इतर साथीदार याचे बँकेचे खात्यावर रक्कम भरण्यास सांगीतले. त्यानंतर फिर्यादी यांना रजिस्ट्रेशनसाठी दुय्यम निबंधक कार्यालय,ठाणे येथे बोलविले असता अ.क्र.१ हा त्याचा फोन बंद करून रजिस्टेशनसाठी हजर न राहता ते त्याचे फायनांन्स ॲन्ड इन्व्हेसमेंन्ट कंपनीचे ऑफीस बंद करून,काही न सांगता निघुन जावुन,फिर्यादी यांना कुठल्याही प्रकारचे कर्ज न देता त्यांची आर्थिक फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एल.आर.सातपुते ९४२३८१९०८० |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे २५४/२०२१,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | गिरिष पांडुरंग भुसळ,वय-३१ वर्ष,रा.सणसवाडी,ता.शिरूर,जि.पुणे |
| **आरोपी** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/०४/२०२१ रोजी पहाटे ०४/०० ते ०८/०० वा.चे दरम्यान फुलगाव,ता.हवेली,जि.पुणे येथे |
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी फुलगाव,ता.हवेली,जि.पुणे येथे असलेल्या कंपनीच्या आवारातील ट्रॉन्सफॉरमर मधील तांब्याची कॉपर वायर ५०,०००/- रूपये किची कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.ना. साळुंखे ९०११३४३०१० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

.